दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २४१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# टेम्पोच्या अपघातात १ ठार ३ जखमी

**दै.रायगड नगरी । रोहा**

**रोहा कोलाड महामार्गावर मुख्यतः बेशिस्त चालकांमुळे अपघातात मोठी वाढ झाली. अशोकनगरच्या वळणावर सातात्याने अपघात होत आहे. त्यातच रोहा कोलाड कोकबण रस्त्याचे रुंदीकरण चालू असल्याने वाढत्या अडथळ्यांनी अपघातात अधिकच भर पडली. अपघाताची घटना मालिका सुरूच असतानाच सोमवारी रात्री उशिरा किल्ला गावाच्या हद्दीतील कालिदास मंगल कार्यालयलगतच्या महामार्गावर बेशिस्त चालकाने अनेकांना उडवले. झालेल्या बेशिस्त विचित्र अपघातात माणगांव येथील एका तरुणाला जीव गमवावा लागला तर अपघातात तीनजण जखमी झाल्याची धक्कादायक घटना घडली. यातील आरोपी चालकाच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाल्याचे समोर आले आहे. त्याच्यावर तरुणाच्या मृत्यूप्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



रोहा धाटावकडून कोलाड बाजूकडे भरगाव वेगात बेदरकारणे वाहन चालवत जाणाऱ्या आरोपीने विरोधी बाजूला जावून फिर्यादींच्या गाडीला जोरदार धडक दिली. यात पुढे मागे असणाऱ्या दोन एक्टिव्हा दुचाकींना ठोकर बसली. यात ज्ञानेश्वर दगडू भावे व ३८ रा. निळज माणगाव या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर गौरव सुर्वे वय ३७ रा निळज माणगाव, यश दाभेकर वय २१ रा. पाटबंधारे कॉलनी कोलाड, धरमनाथ माझी वय ३० रा. किल्ला हे जखमी झाले. यातील अज्ञात आरोपी याची पिकअप गाडी जप्त करण्यात आली. अपघातास कारणीभूत असलेल्या अज्ञात चालकफरार आहे.

संबधीत चालक आरोपीवर ३०४(अ) २७९, ३३७, ३३८ मोका १८४, १३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघात घटनास्थळी उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी यांनी भेट दिली. पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सुरू आहे. दरम्यान, रोहा कोलाड महामार्गावर बेशिस्त वाहनचालकांमुळे अपघातात मोठी वाढ झाली आहे. सावधान, गाड्या सुरक्षीतपणे चालवा असेच आवाहन करण्यात आले आहे.

# खाडीच्या बांधाला भगदाड पडल्याने शेकडो एकर भातशेती पाण्याखाली

## खोपटे गावाला समुद्राच्या पाण्याचा वेढा



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील खोपटे खाडीच्या बांधाची वेळेवर दुरुस्ती केली नसल्याने या बांधाला मोठे भगदाड पडले असून त्या भगदाडातून भरतीच्या वेळी समुद्राचे पाणी पिकत्या भातशेती मध्ये घुसले आहे. परिणामतः शेतकऱ्यांची शेकडो एकर पिकती भातशेती नापीक झाल्याने शेतकऱ्यांवर उपासमारीच संकट ओढावणार आहे. त्यातच खोपटा गावातील घरांनाही वेढा समुद्राच्या पाण्याने घातला असल्याने खोपटे गाव समुद्राच्या पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनानेच संकटाची वेळीच दखल घेवून खाडीच्या बांधाला पडलेले भगदाड बुजवावे अशी आग्रही मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

उरण तालुक्यातील खोपटे गाव खाडी किनारी वसले आहे. सुमारे पाच हजार लोकसंख्या असलेल्या या गावाला शेकडो एकर भातशेती असून बहुतेक भातशेती खोपटे खाडी किनारी आहे. या भात शेतीतून उत्पन्न घेवून येथील शेतकरी आपला चरितार्थ चालवतात. शेतात पिकणारा तांदूळ व खाडीतील मासे यावर चरितार्थ चालविणाऱ्या शेतकऱ्यांच्या भातशेतीचे अलीकडेच खाडीच्या पाण्याने मोठे नुकसान केले आहे.

खारबंदिस्ती खारभूमी विभागाकडे असूनही खोपटे खाडीच्या बांधाची दुरुस्ती केली नसल्याने खाडीला आलेल्या उधानामुळे खाडीच्या बांधाला मोठे भगदाड पडल्याने हे पाणी शेकडो एकर भातशेती मध्ये घुसले आहे.

खारे पाणी भातशेतीत घुसल्याने ती आता नापीक झाली आहे. शेतकऱ्यांच्या हातचे उत्पन्न मातीमोल झाल्याने गरीब शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. खाडीला पडलेले भगदाड अजून बुजविले नसल्याने हे समुद्रातील पाणी आता खोपटे गावात शिरले असून त्याने गावातील घटना वेढा घातला आहे. त्यामुळे या गावातील नागरिक भीतीच्या सावटाखाली वावरत असून खाडीच्या बांधाचे भगदाड लवकरात लवकर बनविण्याची मागणी खोपटे गावचे सुपुत्र तथा मनसेचे तालुकाध्यक्ष सत्यवान भगत यांनी केली आहे.

# खोपोली नगर परिषदेचे र. वा. दिघे वाचनालय अग्निप्रलयातून थोडक्यात बचावले

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषद संचलित र. वा. दिघे वाचनालयात आग लागल्याची माहिती रात्री एक वाजेच्या सुमारास स्थानिकांनी दिली. खोपोली नगर परिषदेचे अग्निशमन दल, खोपोली पोलीस स्टेशनचे कर्मचारी तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे सदस्य तात्काळ घटनास्थळी पोहोचले आणि आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले, स्थानिकांनी देखील यावेळी मोलाची मदत केली.

र. वा. दिघे वाचनालयाच्या पहिल्या मजल्यावर आग मोठ्या प्रमाणात लागल्याने धुराने आतील वातावरण भरून गेले होते. ग्रंथ विभागाचे दरवाजे उघडून काचेच्या खिडक्या फोडल्यानंतर आगीमुळे तयार झालेले वातावरण निवळले आणि आग विझविण्यासाठी आलेल्या यंत्रणेला काम करण्यास संधी मिळाली. ग्रंथ विभागाच्या एका कोपऱ्यात मोठ्या प्रमाणात रद्दी आणि पुस्तकांचा साठा होता आणि तेथील फर्निचर हे लाकडी होते, त्यामुळे तेथे आगीचे प्रमाण प्रचंड मोठे होते. साधारणपणे एक तासाहून अधिक वेळानंतर पाणी आणि अग्निशमन उपकरणांचा वापर केल्यावर आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले. वाचनालयात असलेली संगणक प्रणाली आणि विद्युत उपकरणे शॉर्ट सर्किटमुळे निकामी झाली आहेत. सुदैवाने यंत्रणांनी घेतलेल्या खबरदारीमुळे आगीचे प्रमाण नियंत्रित राहिले, अन्यथा संपूर्ण ग्रंथसंपदा आगीमध्ये जळून खाक झाली असती. वाचनालयात स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यास करण्याकरीता आरक्षित असलेले क्षेत्र मात्र या प्रलयात सुरक्षित राहिले आहे. खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी अनुप दूरे आणि खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे.



# सिडकोच्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पाचे फायनान्शियल क्लोजर पूर्ण

## सिडको मेट्रो प्रकल्पाकरिता आयसीआयसीआय बँकेकडून करण्यात येणार पतपुरवठा





**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळ आणि इंडस्ट्रीअल क्रेडिट न्ड इन्व्हेस्टमेन्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (आयसीआयसीआय) बँक यांच्यात २५ नोव्हेंबर २०२२ रोजी करार करण्यात येऊन या करारानुसार आयसीआयसीआय बँकेकडून सिडको नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ करिता रु. ५०० कोटींचा पतपुरवठा करण्यात येणार आहे. आयसीआयसीआय बँकेकडून मंजूर करण्यात आलेल्या पतपुरवठ्यामुळे मेट्रो मार्ग क्र. १ प्रकल्पाकरिताची फायनान्शियल क्लोजर प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

याद्वारे डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांच्या नेतृत्वाखाली मेट्रो प्रकल्पातील एक मोठा टप्पा गाठला गेला आहे. याबाबत बोलताना डॉ. संजय मुखर्जी यांनी आयसीआयसीआय बँकेकडून करण्यात येणाऱ्या रु. ५०० कोटींच्या पतपुरवठ्यामुळे मेट्रो मार्ग क्र. १ वरील कामांना गती मिळणार असून नियोजित वेळेत कामे पूर्ण होऊन लवकरात लवकर या मार्गावर प्रवासी वाहतूक करता येणे शक्य होणार आहे.

आयसीआयसीआय बँकेकडून मंजूर करण्यात आलेल्या पतपुरवठ्यामुळे एकप्रकारे सिडकोच्या प्रकल्पांच्या विश्वासार्हतेवर मोहोर उमटविण्यात आली आहे, असे मत व्यक्त केले.

नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ वर ३ डब्यांची मेट्रो धावणार आहे. मार्ग क्र. १ बेलापूर ते पेंधर हा ११.१ किमी लांबीचा व ११ स्थानके असणारा मार्ग आहे. या मार्गावरील व्हायडक्टचे काम पूर्ण झाले असून ११ पैकी ५ स्थानके प्रवासी वाहतुकीकरिता सुसज्ज झाली आहेत. या मार्गाकरिता सीएमआरएससह सर्व महत्त्वाच्या परवानग्या प्राप्त झाल्या आहेत. उर्वरित ६ स्थानकांचे काम वेगाने सुरू झाले असून संपूर्ण मार्गावर लवकरच प्रवासी वाहतूक सुरू होणे अपेक्षित आहे.

मेट्रो मार्ग क्र. १ करीता रु. ३,४०० कोटी इतका खर्च अंदाजित असून त्यापैकी रु. २,६०० कोटींचा खर्च सिडकोकडून यापूर्वीच करण्यात आला आहे. उर्वरित खर्च हा आयसीआयसीआय बँकेकडून करण्यात येणाऱ्या रु. ५०० कोटींच्या पतपुरवठ्याद्वारे आणि सिडकोच्या अंतर्गत संचित निधितून करण्यात येणार आहे. नवी मुंबई अंतर्गत कनेक्टिव्हिटी प्रदान करण्याच्या दृष्टीने मेट्रोचे प्रकल्प महत्त्वाचा असून येथील नागरिकांना प्रवासाचा उत्तम पर्याय देण्यासह बांधकाम क्षेत्राला चालना देण्याकरिता हा प्रकल्प मोलाची भूमिका बजावणार आहे.

# नवाब मलिकांचा तुरूंगातील मुक्काम वाढला, विशेष कोर्टाने जामीन नाकारला

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांचा जामीन अर्ज मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळून लावला. अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम आणि त्याच्या साथीदारांच्या बेकायदेशीर कारवायांशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात मलिक यांच्या जामीन अर्जावर मुंबईतील विशेष न्यायालयात आज सुनावणी झाली. न्यायाधीश आर. एन. रोकडे यांनी १४ नोव्हेंबर रोजी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर नवाब मलिक यांच्या जामीन अर्जावरील




निर्णय राखून ठेवला होता. त्यावर आज सुनावणी झाली.

तत्पूर्वी, न्यायालयाने २४ नोव्हेंबर रोजी निकाल सुनावणार असल्याचे सांगितले होते. मात्र, त्या दिवशी न्यायालयाने आदेश तयार नसल्याचे सांगत प्रकरणाची सुनावणी ३० नोव्हेंबरपर्यंत तहकूब केली. अंमलबजावणी संचालनालयाने या वर्षी फेब्रुवारीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्याला अटक केली होती. तो न्यायालयीन कोठडीत असून, त्याच्यावर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मलिक यांनी जुलैमध्ये विशेष न्यायालयात नियमित जामीन अर्ज दाखल केला होता. गोवावाला कंपाउंड आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी अटकेत असणारे मलिक यांची जामिनासाठी धावाधाव गेल्या काही दिवसांपासून सुरूच आहे. शिवसेना खासदार संजय राऊतांना जामीन मंजूर झाल्यानंतर, नवाब मलिकांनाही जामीन मिळेल असा अंदाज राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला होता. पण आज झालेल्या सुनावणी दरम्यान त्यांना जामीन नाकारण्यात आला.

नवाब मलिक यांच्या जामीन अर्जावर सत्र न्यायालयातील विशेष PMLA कोर्टात सुनावणी झाली. कोर्टाने मलिक यांना आज जामीन देण्यास नकार दिला. त्यामुळे मलिक यांचा कारागृहातील मुक्काम आता कायम राहणार आहे.

# ट्रेलरचे टायर फुटून झालेल्या अपघातात १ ठार, १ जखमी



**दै.रायगड नगरी । खोपोली**

पुण्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या टेलरचे अचानक टायर फुटले. त्यामुळे नियंत्रण सुटल्याने टेलरने एकावेळी तीन ट्रकला धडक दिली. यात रस्त्याच्या कडेला असलेली लोखंडी रेलिंग तोडून एक ट्रक हा सुमारे १०० फूट खोल दरीत पडला आहे. तसेच त्याच्या मागोमाग टेलरची केबिन तुटून ती देखील १०० फूट खोल दरीत पडली. या अपघातात टेलर चालक अजित जाधव यास गंभीर दुखापत झाल्याने तो जागीच मृत्यूमुखी पडला. तसेच ट्रक चालक मंगळू हा ट्रकच्या केबिनमध्ये अडकल्याने त्यास खूप प्रयत्नांती बाहेर काढण्यात आले. त्यास गंभीर दुखापत झाली असल्याने त्याला उपचाराकरिता आयआरबी अम्बुलन्सने एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे पाठविण्यात आले आहे. महामार्गावरील विविध सामाजिक यंत्रणा व अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी या सामाजिक संघटनेने जबरदस्त टीमवर्क केल्याने या अपघातातील जीवितहानी नियंत्रित राहिली. अंधार, निसरडी वाट, खडकाळ जागा, काटेरी झुडपे या कशाचीही पर्वा न करता सर्वांनी अखंड मेहनत घेऊन रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण केल्याचे दिसून आले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, आज पहाटे ४ वाजेच्या दरम्यान ट्रेलर (क्र. MH 46 BM 9397) चालक अजित जाधव (वय २५ वर्ष) रा. इरली, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली हा घेवून पुणे ते मुंबई बाजूकडे जात असताना त्याच्या टेलरचे टायर फुटले. त्यामुळे नियंत्रण सुटल्याने त्याने टेम्पो (क्र. MH 13 DQ 3101) यास प्रथम मागील डाव्या बाजूने धडक दिली, त्यानंतर बाजूने जात असलेला ट्रक (क्र. K- 39 - 0344) यास ठोकर मारल्याने हा ट्रक विरुद्ध दिशेला वळला आणि उलटला. त्याच ट्रेलरने पुढे जाणाऱ्या ट्रक (क्र. K- 51 -G 5978) यास पाठीमागून जोरात धडक दिल्याने रस्त्याच्या कडेला असलेली लोखंडी रेलिंग तोडून हा ट्रक हा सुमारे १०० फूट खोल दरीत पडला आहे. तसेच

.../२

# म्हसळ्यात मतिमंद मुलीवर अत्याचार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील लेप गावातील २६ वर्षाचे मतीमंद मुलीवर गावांतील ६५-६६ वयाचे दोन वृध्दानी मुलगी मतीमंद आसल्याचा फायदा घेऊन बलात्कार केल्याची घटना घडली.

पीडीत मुलीचे नातलग महिलेने सदरची फिर्याद म्हसळा पोलीसांत दि.२६ रोजी दिल्याने पोलीसानी गु.र.नं.१२७ / २०२२ भा.द.वि कलम ३७६ एल, ३७६ ड ने गुन्हा नोंदविला असून दोनही वृध्द आरोपीना म्हसळा पोलीसानी अटक केली आहे. वृध्दांना भाजलेल्या भाकऱ्या देण्यासाठी ही पिडीत मुलगी त्यांच्या घरी जात असे,तिच्या साधेपणाचा फायदा सदर वृध्दानी घेऊन दुश्कृत्य केल्याचे सांगण्यात आले. सदर घटनेचा तपास उप-विभागीय पोलीस अधिकारी श्रीवर्धन, प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शना खाली म्हसळा पोलीस स्टेशनचे संदीपान सोनावने करीत आहेत.

# बहुमताने निवडून येण्यासाठी उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका महाविकास आघाडी एकत्रितपणे लढविणार

**दै.रायगड नगरी । उरण**

उरणमध्ये १८ डिसेंबर २०२२ रोजी १८ ग्रामपंचायतच्या निवडणूका होणार असून या १८ ग्रामपंचायतच्या निवडणूका मध्ये निवडणूक लढविण्यासाठी शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष असे चार पक्ष एकत्र आले आहेत.

या चारही पक्षांनी एकत्र येत उरण तालुक्यातील ग्रामपंचात निवडणूका एकत्रित लढविण्याचा निर्णय घेतला आहे. त्या अनुषंगाने सर्व सुत्रे हलविली जात आहेत. या चारही पक्षाने महाविकास आघाडी स्थापन करून त्या द्वारे निवडणूक लढविली जात आहे. उरण तालुक्यात यापूर्वीही विविध निवडणूकीत याच महाविकास आघाडीने निवडणूका लढविल्या आहेत यात महाविकास आघाडीला बरेचशे यश मिळाले आहे. त्यामूळे या ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये महाविकास आघाडी सर्व जागा लढविणार आहे.

प्रत्येक गावागावात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, काँग्रेस (आय), शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) या पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात असून या पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या बळावर व त्यांच्या जनसंपर्कच्या बळावर निवडणूकामध्ये महाविकास आघाडीला बहुमत मिळेल असा विश्वास महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांना आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील , काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेनेचे रायगड जिल्हा प्रमुख मनोहरशेठ भोईर, शेतकरी कामगार पक्षाचे उरण तालुका चिटणीस विकास नाईक आदी महाविकास आघाडीचे प्रमुख नेते ग्रामपंचायत निवडणूकीतील बारीक सारीक गोष्टीवर लक्ष ठेवून आहेत.

# नगर पंचायत प्लास्टीकमुक्त होणे अशक्य; मात्र माणगांवकरांच्या स्वयंस्फूर्त सहभागाने कचरामुक्ती शक्य

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांवमध्ये अनेक दिवसांनी पुन्हा एकदा प्लास्टिक मुक्त माणगांवसाठी नगरपंचायती कडून कारवाई सुरु झाली आहे. यात काही व्यापाऱ्यांना प्लास्टिक पिशवीचा अवैध वापर केल्यामुळे दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले. आता या स्वच्छता मोहिमेत नगरपंचायत कडून कडक कारवाईच्या सूचना देण्यात आल्या असून काही नागरिकांनी याकडे दुर्लक्ष करून कचरा करण्याच्या प्रवृत्तींवर आता सीसीटीव्ही कॅमेराद्वारे थेट नजर ठेवणार आहोत. अशी माहीती स्वच्छता-आरोग्य-क्रिडा सभापती अजित तार्लेकर यांनी दिली आहे. स्वच्छ व सुंदर माणगांवसाठी स्वच्छता ही केवळ नगरपालिका व नगरसेवकांचेच फक्त कर्तव्य नसून, ती आपलीही जबाबदारी आहे. माणगांव मध्ये आपले घर, आपले दुकान, आपल्या उद्योग व्यवसाय च्या ठिकाणी ज्याप्रमाणे आपण स्वतः स्वच्छता राखतो, त्याचप्रमाणे आपले शहर कचरामुक्त, प्लास्टिकमुक्त ठेवण्यासाठी आपला स्वतःचा देखिल सहभाग, सहकार्य आवश्यक आहे.

त्यामुळेच स्वच्छता ज्याच्या घरी तेथे आरोग्य आणि लक्ष्मी वास करी! असं म्हटलं जातं यासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्याला कोणीही न सांगता मी अस्वच्छता करणार नाही व इतर कोणालाही ती करू देणार नाही! अशा प्रकारे माणगांव शहरवासी म्हणून आपले कर्तव्य पार पाडल्यास, शहर स्वच्छ व सुंदर होण्यास वेळ लागणार नाही. ही गोष्ट खरंतर सगळ्यांना कळते पण आचरणातून ती वळत नाही हे दुर्दैवी आहे. माणगांव नगरपंचायतीने अनेक वेळेस प्लास्टिकमुक्ती साठी मोहीमा राबविल्या परंतु प्रत्येक वेळी काही दिवसांच्या दिखाव्यानंतर पुन्हा येरे माझ्या मागल्या ! या उक्तीप्रमाणे शहरातील अनेक भागातील नागरिक गुपचुपपणे किंवा रात्रीच्या वेळेस प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भरून घाण कुडा, कचरा, उरलेसुरले अन्न बेदरकारपणे नवनवीन ठिकाणी निर्माण केलेले ढीग रस्त्यालगत, आडोशाला, कोपऱ्याला फेकून देण्याची प्रवृत्ती आजही माणगांव मध्ये दिसून येत आहे. यात भर काहीजण दिवसाढवळ्या नजरेसमोर कालव्यात कचरा भिरकावतानाचे चित्र आपण सगळेच पाहतो. कालव्याचे चक्क गटारं झाल्याचे बोलतो, पण कोणीही कुणाला यापासुन रोखत नाही.

मोठ मोठे सुशिक्षीत अधिकारी आणि त्यांच्या शासकिय निवास स्थानांत धुळ कचरा जाऊ नये म्हणुन विशेष काळजी घेतात, हिरवी जाळीची कापड बंगल्या सभोवताली लावुन कचरा मुक्त होतात. समाजात फिरताना मात्र त्यांना परिसरातील कचऱ्याचे नवनिर्मीत डंपिंग दिसत नाहीत. याच ठिकाणाहुन स्वतः च्या मुला-बाळांसह फिरताना आपल्या आरोग्याला ते घातक आहे. हे त्यांनाही वेगळे सांगणे न लागो. हे केवळ एक उदाहरण झाले अशीच प्रवृत्ती सर्रास इतर मोठ्या लोकांचीही आहे.

जो पर्यंत स्वच्छता ही आपल्या सर्वांची नैतिक जबाबदारी आपण मानत नाही, आपण कचरा करणार नाही व इतरांनाही तो करु देणार नाही तसेच वेळीच या प्रवृत्तींना रोखुन परावृत्त करत नाही तो पर्यंत शहर स्वच्छतेला मोठा अडसर येतच राहिल हे निश्चित आहे.



# तुर्भे विभागात झाला कोट्यवधींच्या विकास कामांचा भूमिपूजन सोहळा

## दिलेला शब्द आ.भरत गोगावले अन् बाळासाहेबांच्या शिवसेनेने केला पूर्ण

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील तुर्भे भागातील आणि मतदारसंघातील सर्व विकासकामे आ.भरतशेठ आणि बाळासाहेबांची शिवसेनाच करणार असून मुंबईवरून येथे विकास कामे करण्यासाठी कोणीही येणार नाही, असा दावा महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार तसेच बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे उपनेते-पक्ष प्रतोद भरत गोगावले यांनी केला. आ.गोगावले यांच्या प्रयत्नाने मंजूर करण्यात आलेल्या ३ कोटी ५० लाखांच्या विकास कामांचा शुभारंभ सोमवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी करण्यात आला. यावेळी तुर्भे बुद्रुक तुर्भे खोंडा नळ पाणीपुरवठा योजनेचे भूमिपूजन, तुर्भे बुद्रुक शिवाजी चौक ते तुर्भे खोंडा रस्ता भूमिपूजन, तुर्भे बुद्रुक शेलारवाडी रस्ता भूमिपूजन, तुर्भे बुद्रुक सभा मंडपाचे भूमिपूजन, तुर्भे बुद्रुक बौद्धवाडी संरक्षण भिंत भूमिपूजन, तुर्भे बुद्रुक गावठाण रस्ता भूमिपूजन, तुर्भे बुद्रुक मंगेश गोळे यांच्या घराजवळील साकवाचे भूमिपूजन, तुर्भे स्मशानभूमी संरक्षण भिंत उद्घाटन इत्यादी विकास कामांचा भूमिपूजन शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत कळंबे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे तसेच दशरथ उतेकर, संदेश कदम, सरपंच, उपसरपंच,इत्यादी बाळासाहेबांच्या शिवसेनेचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी पंचक्रोशीतील ग्रामस्थ महिला भगिनी इत्यादी उपस्थित होते.

यावेळी आ.गोगावले यांनी, तुम्ही जे जे सांगितले ते आम्ही देण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्ही दिलेला शब्द पाळला. पण या पंचक्रोशीतील काही लोकांनी किती शब्द पाळला, याचे आत्मपरीक्षण करा. आज कोट्यवधी रुपयांच्या विकास कामांचा भूमिपूजन शुभारंभ तुर्भे पंचक्रोशीतील ग्रामस्थ, महिला-भगिनींच्या उपस्थितीत करण्यात आलेला आहे आणि आपण पुढेही जे जे सांगाल ते आपण करणार आहोत. इथे विकास कामे करण्यासाठी मुंबईवरून कोणीही येणार नाही, हे लक्षात असू द्या. तुम्हाला ज्या ज्या वेळेस अडचण भासेल. त्यावेळेस ही स्टेजवर बसलेली मंडळीच लागेल ते सहकार्य करेल. तुमची सर्व विकास कामे आम्ही करत आहोत तुमच्या अडीअडचणीला सामोरे जात आहोत. मग तुम्हाला आणखी काय पाहिजे, आम्ही काहीही चुकीचे करत नाही करणार नाही. अशी ग्वाही दिली.

आम्ही बाळासाहेबांचा वारसा जपण्याचा जोपासण्याचा आणि पुढे नेण्याचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करीत आहोत, असे आ.गोगावले यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले.

यावेळी तुर्भे पंचक्रोशीतर्फे आ.गोगावले आणि मान्यवरांचे जल्लोषपूर्ण स्वागत करण्यात आले.

# पेझारीत ६ व ७ डिसेंबर रोजी श्रीदत्तजयंती उत्सव सोहळा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सालाबादप्रमाणे यंदाच्यावर्षी देखील भगवान श्रीदत्तात्रेयांचा जन्मदिन दत्तजयंती निमित्त रायगड जिल्हा श्रीपंत सांप्रदायाचे मुख्य ठिकाण असलेल्या अलिबाग तालुक्यातील पेझारी येथील श्रीदत्त मंदिरात मंगळवार ६ व बुधवार ७ डिसेंबर २०२२ असे दोन दिवस ५७ व्या श्रीदत्तजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती श्रीपंत सांप्रदाय रायगड जिल्हा प्रमुख व श्रीपंत भक्त मंडळ पेझारीचे अध्यक्ष श्री. दिगंबर राणे यांनी दिली आहे.

मंगळवार ६ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजता प्रेमध्वज पालखी सोहळा श्रीदत्त मंदिरातून निघेल. हा पालखी सोहळा नवजीवन, वरची आळी, खालची आळी, भैरवनाथ, नवीन वसाहत, सरकारी दवाखाना, आंबेपूर, पेझारी नाका मार्गे श्रीदत्त मंदिरासमोर येईल. सायंकाळी ७ वाजता श्रीदत्त मंदिरासमोर शिवाय नमः व दत्तगुरू जय दत्तगुरू या गजरात प्रेमध्वजारोहण होईल. बुधवार ७ डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजता श्रींची पूजा व अभिषेक, पहाटे ५.३० वाजता श्री दत्तात्रेय सहस्रनामावली, सकाळी ७ वाजता प्रेमध्वज पालखी सोहळ्याचे प्रस्थान हा पालखी सोहळा श्रीदत्त मंदिरातून निघून पाटील आळी, आस्तान आळी, ढोलपाडा, गणपती मंदिर दिवलांग, हनुमान मंदिर मार्गे श्रीदत्त मंदिरात परत येईल. दुपारी १.३० वाजता महाप्रसाद, सायंकाळी ५.३० ते ७.०० या वेळेत श्रीदत्त जन्मोत्सव मुख्य सोहळा, सायंकाळी ७ वाजता प्रेमळ सुनंदाताई राणे महिला मंडळ पेझारी यांचे भजन, रात्री ८.३० वाजता श्रीपंत महाराज बाळेकुंद्री यांच्या श्रीदत्त प्रेमलहरी या भजनगाथेतील पदांवर टिपरी नृत्याचा कार्यक्रम होईल व रात्री १० वाजता आरती अवधूताने श्रीदत्त जयंती उत्सवाची सांगता होईल.



बुधवार ७ डिसेंबर रोजी श्रीदत्त जयंती उत्सवाच्या निमित्ताने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महाप्रसादाचा लाभ सर्व भाविक भक्तांना घेता यावा यासाठी महाप्रसाद वाटपाचे शिस्तबद्ध असे नियोजन करण्यात येणार आहे. या दत्तजयंती उत्सवाच्या निमित्ताने २०२३ या नवीन वर्षाची अवधूत दिनदर्शिका भाविकांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. तरी सर्व भाविक, भक्त व गुरूबंधू भगिनींनी ६ व ७ डिसेंबर २०२२ रोजी होत असलेल्या श्रीदत्त जयंती उत्सवाचा आनंद लुटावा असे उत्सव समिती, श्रीपंत भक्त मंडळ पेझारी ता. अलिबाग यांनी सांगितले आहे.

# आपत्ती व्यवस्थापन मॉक ड्रिलचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, UNDP व महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्या पुढाकाराने RIKA INDIA या संस्थेच्या सहकार्याने महाराष्ट्र राज्य स्कूल सेफ्टी कार्यक्रमांतर्गत राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील ३४ शाळा-महाविद्यालयांमध्ये नागरी संरक्षण दल व होमगार्ड यांच्या मदतीने मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे. हे मॉकड्रिल नागरी संरक्षण दल व होमगार्ड विभागातील अधिकारी त्या-त्या शाळा/महाविद्यालयातील संबंधित शिक्षकांशी समन्वय साधून दि.२८ नोव्हेंबर ते दि. १४ डिसेंबर २०२२ या कालावधीत पार पडणार आहेत. या मॉक ड्रिलमध्ये विद्यार्थ्यांना धोक्याची सूचना, आग विमोचन, स्थलांतर याची प्रात्यक्षिके दाखविण्यात येणार आहेत.


"KAMAL GAURI HIRU PATIL SHIKSHAN SANSTHA'S"

**B.K.PATIL INSTITUTE OF PHARMACY**

(Affilliated to University of Mumbai MSBTE, DTE, Approved by AICTE PCIU/S12 OF Pharmacy Act 1948)

Add : Plot No.29, Sector-11, Taloja, Navi Mumbai-410208
Email : bkpatilpharmacy2019@gmail.com

Shri. Babandada Patil
Chairmen / Founder

Date : 30/11/2022

Notification for admission to direct second year B. Pharm on probable vacancy against CAP for the year 2022-23

Schedule of Activities

| Sr. No. | Activity | Stable | |
|---|---|---|---|
| | | First Date | Last Date |
| 1 | Submission of application for admission with application ID at Institute | 30-11-2022 | 2-12-2022 |
| 2 | Display of Provisional merit list & submission of grivances | 03-12-2022 till 12.00 Pm | |
| 3 | Display the provisional merit list | 03-12-2022 till 5.00 Pm | |
| 4 | Institute level Information of admission by submitting required documents & paying fees | 04-12-2022 till 5.00 Pm | |

Note : 1. Candidate Should Physically present during confirmation of Admission.

2. Application form with necessary document accepted as per above schedule only.


पृष्ठ क्र.१ वरुन...

# ट्रेलरचे टायर फुटून झालेल्या अपघातात १ ठार, १ जखमी

त्याच्या मागोमाग टेलर (क्र. MH 46 BM 9397) या वाहनांची केबिन तुटून ती देखील १०० फूट खोल दरीत पडली.

या अपघातात टेलर (क्र. MH 46 BM 9397) चालक अजित जाधव (रा. इरली, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली) यास गंभीर स्वरूपाच्या दुखापती झाल्याने तो मयत झाला आहे. तसेच ट्रक (क्र. K- 51 -G 5978) वरील चालक मंगळू (पूर्ण नाव कळू शकलेले नाही) हा ट्रकच्या केबिनमध्ये अडकल्याने त्यास देवदूत टीम, आयआरबी पेट्रोलिंग, खोपोली पोलीस, बोरघाट वाहतूक पोलीस, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी संस्थेचे सदस्य, लोकमान्य आरोग्य सेवा, डेल्टा फोर्स आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाच्या जवानांनी खूप प्रयत्नांती बाहेर काढले. त्यास गंभीर दुखापत झाली असल्याने त्याला उपचाराकरिता आयआरबी अम्बुलन्सने एमजीएम हॉस्पिटल पनवेल येथे पाठविण्यात आले आहे. तसेच मयत यास खोपोली नगर पालिका हॉस्पिटल खोपोली येथे रवाना करण्यात आले आहे. अपघातातील वाहने रस्त्याच्या कडेला केल्याने वाहतूक सुरळीत झाली आहे. अपघात खोपोली पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेला असल्याने पोलीस निरीक्षक शिरीष पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू करण्यात आला आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल १) मे.स्पॅन स्ट्रक्चर्स २) श्री.उदयम रमाकांत नाईक ३) श्री.सार्थक महेश नाईक यांनी मुळ मालक १) श्री.सुनील रतन कोळी उर्फ फडकर २) शैलजा जयवंत कोळी ३) शर्मिला दिलीप भगत ४) मयुर रतन कोळी उर्फ फडकर त्यांच्या मालकीची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी खालील भूखंड मिळालेला असून सदरहू भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**सिडको फईल नं.८३/उलवे**

| नोड | सेक्टर नं. | प्लॉट नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे | १९ | २७१ | १३९९.८९ चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची कोणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांत आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदोपत्रीनिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

सही/-
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

---

मा.गुन्नाल सो कोर्ट
वकील श्री.शशिकांत मुंढे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१५२१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/१२/२०२२

१) श्री.सुशांत गुलबराव गुंडे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.संदीप गुलबराव गुंडे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
(अर्जदार क्र.१ व २ यांच पत्ता)
रा.घर नं.३०३, गंगा रिजेन्सी,
विचुंबे, नवीन पनवेल-४१०२०६
३) सौ.स्वाती विशाल पाचरणे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
रा.डी-१३५, जनाब बिल्डींग, रुम नं.१८,
सुभाष लेन, घोडपदेव, मुंबई-४०००३३ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्यापेक्षा मयत कै.अलका गुलबराव गुंडे या दिवशी घर नंबर-ई ३०३, गंगा रिजेन्सी, विचुंबे, पनवेल, रायगड-४१०२०६ येथे निधन झाले. अर्जदार श्री.सुशांत गुलबराव गुंडे यांनी मयत यांचा मुलगा या नात्याने कोर्टास सदरहू मयताचे कायदेशीर हक्कदार म्हणून अर्ज केला आहे. त्यांच्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

घर नंबर-४०८, मानस वसुधा, ४ था माळा, प्लॉट नंबर-६८, सेक्टर-५, उलवे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

सदर मिळकतीमध्ये मयत कै.अलका गुलबराव गुंडे यांचा १/३ एवढा कायदेशीर हक्क व अधिकार आहे.

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळविण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास पनवेल येथील न्यायालयात लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न असल्यास अर्जदारांच्या विनंती प्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१७/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री.नवीन जयंत तामस्कर यांचे द्वारे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांचे वडील कै.जयंत प्रभाकर तामस्कर यांचे निधन दि.०८/०२/२०२१ रोजी बी पी टी हॉस्पिटल, नाडकर्णी पार्क, वडाळा (पूर्व), मुंबई-४०००३७ येथे झालेले आहे.

खालील वर्णन केलेली मिळकत ही कै.जयंत प्रभाकर तामस्कर व त्यांच्या पत्नी श्रीमती.सुवर्णा जयंत तामस्कर यांनी खरेदी केलेली आहे.

**निवासी सदनिका :**
**मौजे : सुकापूर शिलोत्तर रायचुर, ता.पनवेल, जि.रायगड**
विघ्नहर्ता को.ऑप.हौ.सो.लि.,
रो हाऊस नं.६०
सर्व्हे नं.४६, हि.नं.१/५/ब
ता.पनवेल, जि.रायगड
क्षेत्रफळ : १०७८ स्क्वे.फुट (कारपेट एरिया)

कै.जयंत प्रभाकर तामस्कर यांच्या मृत्यूनंतर वरील वर्णनाच्या सदनिकेबाबत १) श्री.नवीन जयंत तामस्कर (मुलगा), २) श्रीमती. सुवर्णा जयंत तामस्कर (पत्नी), ३) कु.नवेली जयंत तामस्कर (मुलगी) हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

सदर मिळकतीबाबत त्यांच्या वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणत्याही इसमाचा अथवा संस्थेचा वारसाहक्क, मालकी हक्क, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, मृत्यूपत्र, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची हस्तांतरणास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थानी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतः हून हजर होवून आमचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसात कळवावी. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचा अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे व आमचा अशिलांच्या हस्तांतरणास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.३०/११/२०२२

सही/-
**ॲड.उदय प्रकाश मोकल**
**ए-६३, रुम नं.१०, सेक्टर-१, जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी नोड, ता.उरण, जि.रायगड ४००७०७**
**मो.नं.९०८२९११९१३**

---

मा.गुन्नाल सो
अर्जदारतर्फे वकील
ॲड.शशिकांत आ. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्ययाधिश सो. व.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७५७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२३

१) श्रीमती.ललिता शशिकांत म्हात्रे
वय : ५२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.सिद्धेश शशिकांत म्हात्रे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
अर्जदार नं.१ व २ रा.सिद्धीसाई रो-हाऊस,
सी-३२/३१, सेक्टर १२, गोखले हायस्कूल जवळ,
खारघर, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.प्रिती संकेत पाटील
वय : ३२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मनोबल सोसायटी, रुम नं.बी-१०१,
महात्मा फुले नगर ठाणे-प.४००६०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै.शशिकांत गोविंद म्हात्रे हे दि.२३/११/२०२१ रोजी अपोलो हॉस्पिटल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे मृत्यू पावले आहेत. तसेच कै.शशिकांत गोविंद म्हात्रे यांचे वडील कै.गोविंद जाखा म्हात्रे हे दि.०३/०९/२०१० रोजी मु.कान्होबा, ता.पेण, जि.रायगड येथे मृत्यू पावले आहेत व आई कै. कमलाबाई गोविंद म्हात्रे ह्या दि.३०/०७/२०२२ रोजी मु.कान्होबा, ता.पेण, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या आहेत. सबब कै.शशिकांत गोविंद म्हात्रे यांस अर्जददार हेच प्रथम श्रेणीतील कायदेशीर वारस आहेत.

**कै.शशिकांत गोविंद म्हात्रे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे मारुती सुझुकी या कंपनीची व्हॅगनर ही गाडी आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणेः-**

कंपनीचे नाव : मारुती सुझुकी
गाडीचे नाव व मॉडेल : WAGONR LXI CNG BS4
रजिस्ट्रेशन नं. : MH46W2099
रजिस्ट्रेशन दि. : 17/10/2022
इंजिन नं. : K10BN7189992
चेसी नं. : MA3EWDE1S00467355
अंदाजे किंमत रु.१,६३,६४१/-

अर्जदार हे वरील मिळकती संदर्भात मयताचे कायदेशीर वारसदार आहेत. सदर मिळकतीच्या अर्जदार यांच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट अर्जदार नं.१) श्रीमती.ललिता शशिकांत म्हात्रे २) श्री.सिद्धेश शशिकांत म्हात्रे ३) सौ.प्रिती संकेत पाटील ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील कै.शशिकांत गोविंद म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. असा मे कोर्ट वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.३०/११/२०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
(कोर्टाचा शिक्का)
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

# कामोठे आगीच्या घटनेतील दोषींवर कारवाईची मागणी

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

मानसरोवर रेल्वे स्टेशन जवळील पार्किंग मधे उभ्या असलेल्या दुचाकींना आग लागल्याची घटना घडली. ह्या आगीमुळे कामोठे करांचे लाखोंचे नुकसान झाले.

ह्या घटनेची दखल घेत आज कामोठे कॉलोनी फोरमतर्फे घटनास्थळाची पाहणी करत सिडको तसेच रेल्वे प्रशासनाला जाब विचारण्यात आला. यावेळी सिडकोचा हलगर्जीपणा नागरिकांच्या लक्षात आल्यानंतर संताप व्यक्त करण्यात आला. मानसरोवर रेल्वे स्टेशन जवळच्या पार्किंगची जागा पंत प्रधान आवास योजने मुळे सिडकोने नागरिकांच्या हक्काची हिरावुन घेतली. अडीच ते तीन लाख लोकसंख्या असलेल्या कामोठे शहराला पुरेसे पार्किंग उपलब्ध करून देण्यास सिडको अपयशी ठरत आहे. कामोठे कॉलोनी फोरम तर्फे यापूर्वी वारंवार सिडको प्रशासनाकडे पार्किंग साठी पाठपुरावा केलेला असुन सिडकोला विषयाचे गांभीर्य कळलेले नाही. आगीच्या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारत सिडकोने नागरिकांना नुकसान भरपाई देण्याची मागणी कॉलोनी फोरम तर्फे करण्यात आलीआहे. तसेच रेल्वे स्टेशन मास्तर ह्यांना जाब विचारला असता त्यानी आधीच सिडको प्रशासनाला स्टेशन परिसरातील सुकलेले गवत कापण्यासाठी पत्रव्यवहार केल्याची माहिती मिळाली, सिडकोने जर वेळीच कारवाई करत स्टेशन परिसरातील गवत साफ केले असते तर काल लागलेली आग मोठ्या प्रमाणात पसरली नसती. त्यामूळे वाहनांना आग लागून झालेल्या नुकसानास सिडकोचा हलगर्जीपणा सुद्धा जबाबदार आहे. स्टेशन परिसरात लागलेली आग निव्वळ अपघात होता की घातपात ह्याची सखोल चौकशी करत दोषींवर कठोर कारवाई करण्याची कामोठे पोलिस स्टेशनला लेखी मागणी कामोठे कॉलोनी फोरमतर्फे करण्यात आली. ह्यावेळी कामोठे फोरम अध्यक्ष मंगेश अढाव, महिला अध्यक्ष जयश्री झा, शुभांगी खरात, बापु साळुंखे, राहुल बुधे, संदिप इथापे, रवी पाढी, निरव नंदोला, जयवंत खरात, प्रविण भालतडक उपस्थित होते.



# चला जाणुया नदी अभियान अंतर्गत तळोजा, नावडे येथे जनजागृतीपर प्रभातफेरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र शासनाच्या चला जाणुया नदीला अभियान अंतर्गत तळोजा (नावडे), पनवेल येथील म्हात्रे विद्यालय ते गणेशघाट अशी जनजागृतीपर प्रभातफेरी आयोजित करण्यात आली होती .

या ठिकाणी कासाडी नदी संवर्धन मोहीम हाती घेण्यात आली. यामध्ये पंचक्रोशितील नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्यने सहभागी झाले होते.

या संवादातून नद्यांच्या संर्वधानासाठी करण्यात येणार्या उपाययोजनांबाबतची माहिती नागरिकांपर्यंत पोहचेल व यातून परिणामी गावकर्यांचा सहभाग निश्चितच वाढणार आहे. यावेळी तहसीलदार विजय तळेकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

मा.गुन्नाल साहेब कोर्ट

अ‍ॅड.सुनील एन. मोरे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७६५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१७/०१/२०२३

१) श्रीमती.मोहनी तुलसीदत्त भट्ट
वय : ६९ वर्षे, व्यवसाय : घरकाम
२) श्री.चंद्रशेखर तुलसीदत्त भट्ट
वय : ४८ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.हरीश तुलसीदत्त भट्ट
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
अर्जदार नं.१ ते ३ रा.पी एल–६ (अे)/१०/११,
सुयोग अपार्टमेंट, सेक्टर नं.१,
खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.महेशचंद्र तुलसीदत्त भट्ट
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०१, बी–विंग, विघ्नहर्ता सीएचएस,
प्लॉट नं.७, सेक्टर नं.१, खांदा कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.तुलसीदत्त हरिदत्त भट्ट यांच्या नावाने सिडकोकडे नोंदीत आहेत. अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.तुलसीदत्त हरिदत्त भट्ट हे दि.१०/०४/२०२१ रोजी शेलार हॉस्पिटल, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ ते ४ यांची आजी कै.जयंती हरिदत्त भट्ट या दि.२२/१०/१९८० रोजी मु.भाटीगांव, पो.बिलाई, पिथौरागढ, उत्तरांचल येथे मयत झालेले असून त्यांच्या मृत्यूची नोंद सरकारी कार्यालयात केलेली नाही. कै.तुलसीदत्त हरिदत्त भट्ट यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संर्दभात वारस दाखल मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टास अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे : नवीन पनवेल (प.), ता.पनवेल,
जि.रायगड येथील सिडको हद्दीतील
पी एल–६अे/१०/११,
सेक्टर नं.१, नवीन पनवेल (प.),
ता.पनवेल, जि.रायगड

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.३०/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही–शिक्क्याने दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# पेण तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी रणशिंग फुंकले

## तिसऱ्या दिवस अखेर २४४ अर्ज दाखल

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी रणशिंग फुंकले असून भाजप, शेकाप, राष्ट्रवादी काँग्रेस, बाळासाहेबांची शिवसेना शिंदे गट, मनसे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस आदी सर्वच पक्ष निवडणुकीत उतरले आहेत. आज अखेर पर्यंत थेट सरपंच पदासाठी ४९ तर सदस्य पदासाठी १९५ असे एकुण २४४ अर्ज दाखल करण्यात आले आहेत.



पेण तालुक्यातील सर्वात मोठी समजली जाणाऱ्या दादर ग्रामपंचायत मध्ये राष्ट्रवादी ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष यशवंत घासे, शेकापक्षाच्या नेत्या स्मिता पाटील व कॉग्रेस नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली आज थेट सरपंच पदाच्या उमेदवार तेजस्वी संतोष म्हात्रे व १३ सदस्यांचे अर्ज दाखल करण्यात आले. या निवडणुकीत महाविकास आघाडीच बाजी मारणार असल्याचे सांगून दादर गावचा विकास हाच आमचा ध्यास असल्याचे दादर गावचे सुपुत्र तथा प्रसिद्ध उद्योजक यशवंत घासे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे, शेकापचे माजी आमदार धैर्यशील पाटील, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली दादर ग्रामपंचायत एक संघी करून आम्ही जनतेच्या हितासाठी लढण्याचे ठरवले आहे. येणाऱ्या काळात दादर गावाचा विकास अधिक झपाट्याने करण्याचा दृष्टिकोन आम्ही सर्व नेत्यांनी ठेवला आहे.

अर्ज दाखल करण्यासाठी माजी सरपंच चंद्रकांत पाटील, दीपक पाटील, संदीप पाटील आदींसह तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. दरम्यान आज दादर गावच्या विकासासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना ठाकरे गट, शेकाप आणि इतर पक्षांनी एकत्र येऊन एकप्रकारे तयार केलेल्या महाविकास आघाडीचे विजयाचे रणशिंग फुंकले आहे. पेण तालुक्यात ग्रामपंचायत निवडणूक साठी आज तिसऱ्या दिवशी थेट सरपंच पदासाठी ११ तर सदस्य पदासाठी ८८ असे एकुण ९९ अर्ज दाखल झाले असून आतापर्यंत थेट सरपंच पदासाठी ४९ तर सदस्य पदासाठी १९५ असे एकुण २४४ अर्ज दाखल करण्यात आले आहेत.

# नियोजन भवन येथे पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या रायगड जिल्हा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र गरुडझेप मार्फत उपविभागीय अधिकारी अलिबाग प्रशांत ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २९ नोव्हेंबर २०२२ रोजी जिल्हा नियोजन भवन येथे पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये अलिबाग तालुक्यातील १४५ प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

कोणतही काम पूर्ण होईपर्यंत अशक्य वाटत असते. मात्र परिश्रम आणि चिकाटी याचा आपल्या दैनंदिन जीवनात वापर करून कोणत्याही परीक्षेला सामोर जाता येते, अशा उत्स्फूर्त शब्दांत उपस्थित तरुण–तरुणींना मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी मधुकर बोडके, परिविक्षाधीन तहसिलदार अक्षय ढाकणे, नायब तहसिलदार श्रीम. श्रद्धा चौगुले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आत्मज मोरे, मुंबईतील देवनार पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक रामचंद्र तांबे यांनी प्रशिक्षणार्थींना पोलीस भरतीच्या अनुषंगाने परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरणे, पुस्तकांची उपलब्धता, पोलीस भरती परीक्षेचा अभ्यासक्रम व शारिरीक क्षमता चाचणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

मा.गोडसे मॅडम

अ‍ॅड.सुलक्षणा द जगदाळे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३८७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.६/०१/२०२३

१) श्री.एकनाथ शनिवार गोवारी
वय : ६२ वर्षे, व्यवसाय :
पत्ता : कामोठे पनवेल, रायगड ४१०२०६
२) श्री.महादेव शनिवार गोवारी
वय : ६० वर्षे, व्यवसाय :
पत्ता : कामोठे पनवेल, रायगड ४१०२०६
३) श्री.जनार्दन शनिवार गोवारी
वय : ५६ वर्षे, व्यवसाय :
पत्ता : कामोठे पनवेल, रायगड ४१०२०६
४) सौ.गुणाबाई निळकंठ भगत
वय : ५० वर्षे, व्यवसाय :
पत्ता : माऊली निवास रोड नं.६,
सेक्टर १९, न्यू पनवेल, रायगड–४१०२०६
५) सौ.चंद्राबाई शिवदास पाटील
वय : ६३ वर्षे, धंदा : गृहिणी
पत्ता : स्वागत कॉम्प्लेक्स त्रिमुर्ती बिल्डींग,
बी, ००७, सुकापूर, पनवेल, रायगड ४१०२०६
६) सौ.रेश्मा रवींद्र भगत
वय : ५३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : माऊली निवास रोड नं.६,
सेक्टर १९, न्यू पनवेल, रायगड–४१०२०६ अर्जदार

ज्याअर्थी कै.सिताबाई शनिवार गोवारी यांचा मृत्यू दि.१०/०४/२०२२ रोजी कामोठे पनवेल, रायगड ४१०२०६ येथे त्यांच्या राहत्या घरी झालेला आहे. त्यांच्या व हिस्सेदार यांच्या नावे खालील वर्णनाची भूखंड मिळकत आहे.

**भूखंडाचे वर्णन**
**सिडको अ‍ॅवॉर्ड केस नं.३४०, सर्व्हे नं.१५/३,**
**कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूखंड क्र. | सेक्टर | नोड | तालुका व जिल्हा | क्षेत्रफळ | सिडको संचिका |
|---|---|---|---|---|---|
| ३ सी | १७ | कामोठे | पनवेल, रायगड | २१० चौ.मी. | १६६ अ |

| भूखंड क्र. | सेक्टर | नोड | तालुका व जिल्हा | क्षेत्रफळ | सिडको संचिका |
|---|---|---|---|---|---|
| ४९ ए | १२ | कामोठे | पनवेल, रायगड | १८८.१४ चौ.मी. | १६६ अ |

सदर मिळकती या कै.सिताबाई शनिवार गोवारी यांच्या नावे असून मृत्यूपश्चात त्यास अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार हे सदरचा वारसदाखला मिळणेबाबत अर्ज करीत आहे. सदरचा वारसदाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणीही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत त्या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारसदाखला देण्यात येईल व त्यामागून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# देशी दारूचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील पुष्पकनोड येथे विनापरवाना देशी दारूचा साथ विक्री केल्याप्रकरणी एका इसमास पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून मुद्देमाल हस्तगत केला आहे.

तालुक्यातील पुष्पकनोड सेक्टर आर ४ येथील किराणा दुकानाचे व्यवसाय करणारे हरीशंकर महानंदा पटेल (वय ५७ वर्षे) यांनी त्यांच्या दुकानात विनापरवाना देशी दारूचा साठा करून विक्री केल्याप्रकरणी त्याला ताब्यात घेण्यात आले आहे व १७ देशी दारूच्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या आहेत.

## जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.३१/२०२१
नि.नं.३०/ड
ने.ता.१८/०१/२०२३

१) श्रीमती.राजश्री सुधीर तांडेल
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
२) कुमार सार्थ सुधीर तांडेल
वय : १३ वर्षे, धंदा : शिक्षण
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

१) श्री.सुभाश मनोहर तांडेल
वय : वर्षे, धंदा : शेती
२) श्री.दौलत मनोहर तांडेल
वय : वर्षे, धंदा : शेती
३) श्रीमती.लक्ष्मीबाई मनोहर तांडेल
वय : ३३ वर्षे, धंदा : शेती
रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे सासरे व आजोबा तसेच सामनेवाला क्र.१ व २ यांना त्यांचे वडील व क्र.३ यांना त्यांचे पती मनोहर उर्फ मणीराम धर्मा तांडेल यांच्याकडून वारसाहक्काने आलेली मिळकत आहे. सदरची मिळकत ही मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांची मिळकत होती. कै.मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल हे दि.२०/०९/२००७ रोजी मु.जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तर कै.सुधीर मनोहर तांडेल हे दि.१०/०५/२०२० रोजी मयत झालेले आहेत. कै.मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांच्या नावे खालील मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड येथे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : जसखार, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | यु.के.नं. | अवॉर्ड नं. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० | २ | ०–०४–४ | | |
| २ | ११ | ६ | ०–१३–८ | २२६ | ५३ |
| ३ | २२० | ९ | ०–०१–८ | | |
| ४ | १८२ | ६ | ०–०६–८ | | |
| ५ | २६ | ३ | ०–०४–४ | | |
| ६ | ४१ | २ | ०–१०–८ | | |
| ७ | ४४ | ४ | ०–०५–० | | |
| ८ | ४७ | ४ | ०–०२–० | | |
| ९ | ५३ | ५ | ०–०४–४ | | |
| १० | ३९ | १ | ०–०५–१२ | | |
| ११ | ६९ | ४ | ०–०९–८ | २२६ | २२६ |
| १२ | ११५ | ९ | ०–०६–४ | | |
| १३ | ११६ | ११ | ०–०४–८ | | |
| १४ | ११६ | १२ | ०–०३–४ | | |
| १५ | १४९ | ७ | ०–०४–४ | | |
| १६ | १५३ | १ | ०–१०–० | | |
| १७ | १६६ | ४ | ०–०७–१२ | | |
| १८ | १६७ | ३ | ०–०३–८ | | |
| १९ | १०६ | १२ | ०–०३–० | | |

कै.मनोहर उर्फ मणिराम धर्मा तांडेल यांचे मृत्यूपश्चात त्यांचा मयत मुलगा सुधीर त्यांच्या पश्चात अर्जदार सामनेवाला हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदर यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार व सामनेवाला यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहर परिसरात अंदाजे ५० ते ५५ वर्षीय इसमाचा बेवारस मृतदेह आढळला असून पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहे. सदर इसमाबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांच्याशी संपर्क साधावा.

In the court of Hon'ble Civil Judge S.D Panvel A.R.Gunnal

Adv Sunita S Prabhu
Adv.for Applicant
Mob- 8169629608

## PUBLICE NOTICE

**IN THE COURT OF CIVIL JUDGE**
**[S. D] PANVEL AT PANVEL**

MISC. APPLICATION NO.1693 OF 2022
Exh No.7/D
N.D. 6/1/23

1,MRS. KHAIRUNNISA SHAUKAT MIRZA
Age 69 Years, Occupation: Housewife
2.MR. ZAEEM SHAUKAT MIRZA
Age 37 Years, Occupation: Service
No 1 and 2 have their residence
address at101, FIRST FLOOR,
MORAJ GATEWAY CO-OP HOUSING
SOCIETY LTD., PLOT NO 448, 449/2
TAKKA, City: PANVEL,
State: MAHARASHTRA, INDIA.
PINCODE 410206
3.MRS. DURRULAIN SHAUKAT MIRZA
w/o MR. MOHAMMED ABDULAZIZ SHAIKH
Age 43 Years, Occu: Housewife
Address: FLAT 4, FIRST FLOOR,
DEEP VILLA CHS LTD, PLOT NO: 85,
SECTOR- 19A, LANDMARK:
OPP YASHWANTRAO CHAVAN
GROUND NERUL (EAST)
NAVI MUMBAI, MH, INDIA 400706
4.MRS. TABULAIN SHAUKAT MIRZA
W/O FAIYAZ AHMAD ANSARI
Age 43 Years, Occu: Housewife
Address: 1-D, 53, SWAGAT,
NARENDRA PARK, NAYA NAGAR,
MIRA ROAD, THANE, MH,
INDIA 401107 APPLICANTS

V/S

NIL OPPONENT

That the Late **Mohammed Shaukat Mirza** Died on 11/05/2021 at Nerul, Navi Mumbai. That, during the lifetime of the deceased **Mohammed Shaukat Mirza** Purchased Immovable Property is as Follows:-

**SCHEDULE 'A' PROPERTY**

Residential apartment located at 101, FIRST FLOOR, MORAJ GATEWAY CO-OP HOUSING SOCIETY LTD., PLOT NO 448, 449/2 TAKKA, City: PANVEL, State: MAHARASHTRA, INDIA. PINCODE 410206 Part area owned by ZAEEM SHAUKAT MIRZA

**SCHEDULE 'B' PROPERTY**

All the piece and parcel of land property lying, being, and located at GAT NO 523/5, GAT NO UPVIBHAG BHOGVATADAR VARG 2, VILLAGE DHOTRE BUDRUK, TALUKA PARNER, DISTRICT AHMEDNAGAR, STATE MAHARASHTRA, INDIA Part area owned by Late MR. MOHAMMED SHAUKAT MIRZA's brothers and sisters

**SCHEDULE 'C' PROPERTY**

Residential apartment located at NL6/16/2/11, Shanti Niketan Apartment, Sector-9, Nerul East, Nerul Node III, Navi Mumbai; also written as NL6/16/11, SECOND FLOOR, SECTOR 9, PHASE I, NERUL, City: NAVI MUMBAI, State: MAHARASHTRA, INDIA. PINCODE 400706 also written as NL6/16/11, SECTOR 9, NERUL, NAVI MUMBAI, MH, INDIA 400706.

**SCHEDULE 'D' PROPERTY**

Residential apartment property at ENKAY HOME'S RESIDENTIAL TOWNSHIP named ENKAY GARDENS in FLAT 201, LILY BUILDING, SECOND FLOOR, Village: WAVANJE, NEAR MIDC, TALOJA, PANVEL, District: RAIGAD, State MAHARASHTRA, INDIA.

**SCHEDULE 'E' PROPERTY**

Residential apartment property at ENKAY HOME'S RESIDENTIAL TOWNSHIP named ENKAY GARDENS in FLAT 202, LILY BUILDING, SECOND FLOOR, Village: WAVANJE, NEAR MIDC, TALOJA, PANVEL, District: RAIGAD, State MAHARASHTRA, INDIA.

**SCHEDULE 'F' PROPERTY**

Residential apartment property located at FLAT 701, MORAJ BUILDERS, A - MAA SMRITI BUILDING, situated in CTS NO 1106, VILLAGE CHINCHAVALI SHEKIN, OPPOSITE LOWJEE RAILWAY STATION, KHOPOLI, TALUKA KHALAPUR, DISTRICT RAIGAD State: MAHARASHTRA, INDIA. PINCODE 410203

**SCHEDULE 'G' PROPERTY**

Residential apartment property located at FLAT 702, MORAJ BUILDERS, A - MAA SMRITI BUILDING, situated in CTS NO 1106, VILLAGE CHINCHAVALI SHEKIN, OPPOSITE LOWJEE RAILWAY STATION, KHOPOLI, TALUKA KHALAPUR, DISTRICT RAIGAD State: MAHARASHTRA, INDIA. PINCODE 410203

Whereas the above named Applicant has filed Misc Application 1693/2022 for Heirship Certificate under Bombay Regulation VIII of 1827, the Court of Civil Judge (SD) Panvel, at Panvel.

You the member of Public are hereby given Notice to appear in the Court of Civil Judge (SD) Panvel, At panvel, in person or by pleader duly instructed and to file your say/objection if any within 30 (thirty) days from the date of publication of this public notice. Failing which said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under hand and seal of the court this 30th day of November 2022

Sd/-
Jr. clerk
Civil Judge
(SD) Panvel

Court Seal

Sd/-
Asst. Superident
Civil Judge
(SD) Panvel

# पोलादपूर माटवण येथील हत्येप्रकरणी ९ आरोपींना जन्मठेप

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील माटवण या महसुली गावात रविवार, दि.३१ मे २०२० रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास ज्येष्ठ शिवसैनिक गणपत विश्राम मांढरे यांची निर्घृण हत्या झाली. शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्षामधील राजकीय वादाची परिणिती जीवघेण्या हल्ल्यात होऊन पोलादपूर पोलीसांनी एफआयआरमध्ये या खुनप्रकरणी तब्बल ४२ आरोपींचा समावेश करून तपासादरम्यान आरोपींची संख्या कमी करीत शेवटी केवळ ९ आरोपींचा समावेश या गुन्ह्यात निश्चित केला. मंगळवार, दि.२९ नोव्हेंबर २०२२ रोजी माणगाव येथील अतिरिक्त सत्र न्यायाधिश टी. एम. जहागिरदार यांनी सर्व ९ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी ५० हजार रूपये दंड ठोठावला आहे.

पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्हा रजिस्टरमध्ये यातील मयत गणपत विश्राम मांढरे (५५) व फिर्यादी अतुल गणपत मांढरे यांचे आरोपींसोबत वाद असून सर्व आरोपी एकाच गाव परिसरातील असल्याचे तसेच शिवसेना आणि शेतकरी कामगार पक्ष या दोन राजकीय पक्षांच्या वर्चस्वावरून हा वाद सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या वादावरून वैमनस्य झाल्यावरून आरोपींनी रविवार, दि. ३१ मे २०२० रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास गैरकायद्याच्या मंडळींची गर्दी जमवून कट रचून गणपत विश्वास मांढरे हे त्यांच्या हिरोहोण्डा स्प्लेंडर मोटारसायकल (क्रमांक एमएच३६ बीबी ५३४४)वरून विलास पांडुरंग गोगावले यांच्या गुरांच्या वाड्याजवळून माटवण येथून कामानिमित्त बाहेर जात असताना त्यांना रस्त्यात अडवून लाकडी दांडक्यांनी व बांबूंच्या काठ्यांनी डोक्यावर व कपाळावर मारहाण करून जिवे ठार मारल्याची घटना घडली होती. याचवेळी मा. जिल्हादंडाधिकारी यांचा कोरोना विषाणू संसर्ग अन्वये काढण्यात आलेल्या जमावबंदी आदेशाचा भंग केल्याने तब्बल ४२ जणांना आरोपी करण्यात आले.

याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये मृत गणपत विश्राम मांढरे यांचा सख्खा भाऊ सखाराम विश्राम मांढरे (वय५०) याच्यासह विठ्ठल कृष्णा म्हस्के (वय ५५) हे दोघे आत्मसमर्पणासाठी हजर झाले तर अधिक तपासादरम्यान पोलादपूर पोलीसांनी विकास विठ्ठल म्हस्के (वय २४), संकेत नारायण म्हस्के (वय २९), विलास पांडुरंग गोगावले (वय ४०), नाना नथू मांढरे (वय ५०) आणि नाना धोंडू म्हस्के (वय ५५), यांना अटक करण्यात आली. रविवार, दि.३१ मे २०२० रोजी रात्री ९ वाजून ५३ मिनिटांनी याप्रकरणी पोलादपूर पोलीस ठाण्यात सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव यांच्या तपासी अंमलाखाली २८–२०२० नुसार भा.दं.वि. ३०२, ३४१, १४३, १४७, १४८, १४९, १२०(ब), १८८, महाराष्ट्र पोलीस अ‍ॅक्ट ३७(१)(३), १३५ आदी कलमान्वये गुन्हा ४२ आरोपींविरूध्द दाखल करण्यात आला. यात आधीच्या ७ आरोपींसोबत स्वप्नील सखाराम मांढरे, शंकर गजानन सागवेकर, गणेश नाना म्हस्के, शैलेश शंकर सागवेकर, विजय अशोक नगरकर, राजेंद्र अशोक नगरकर, महेश नथू मांढरे, कमलाकर गजानन सागवेकर, कृष्णा धोंडू म्हस्के, रोशन कृष्णा म्हस्के, काशिनाथ शांताराम म्हस्के, देऊ धोंडू शिंदे, समीर नारायण म्हस्के, दत्ताराम भाऊ पवार, सुशांत दत्ताराम पवार, प्रशांत दत्त–ाराम पवार, संतोष लक्ष्मण डिगे, संतोष पवार, तुळशीराम धोंडू म्हस्के, गणपत सुंदर मांढरे, चंद्रकांत बावळेकर, गणेश गोगावले, शिवाजी शंकर गोगावले, कैलास धोंडू नवगणे, प्रमोद परशुराम करंजे, सिताराम म्हस्के, नारायण म्हस्के, राम गायकवाड, विश्वास बाटे, निलेश बाटे, एकनाथ अर्जून मांढरे, रवींद्र नथू मांढरे, राजू श्रीपत कालगुडे आणि दत्तात्रेय उतेकर आदी ३४ आरोपींचाही समावेश तपासाअंती करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव, रोहा उपविभागीय पोलीस अधिकारी किरणकुमार सुर्यवंशी यांनी केल्यानंतर या ३४ पैकी राजू श्रीपत कालगुडे आणि कैलास धोंडू नवगणे या दोन आरोपींचा आधीच्या सखाराम विश्राम मांढरे, विठ्ठल कृष्णा म्हस्के, विकास विठ्ठल म्हस्के, संकेत नारायण म्हस्के, विलास पांडुरंग गोगावले, नाना नथू मांढरे आणि नाना धोंडू म्हस्के या सात आरोपीसोबत समावेश करून एकूण ९ आरोपी निश्चित करण्यात आले. या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायालय माणगांव येथे झाली असता या खटल्याप्रकरणी सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी सर्वोच्च न्यायालयाने दिलेले १९ न्यायनिर्णय दाखल केले. यावेळी फिर्यादी यांना मदतनीस म्हणून अ‍ॅड.मोहिनी शेठ यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली. या खटल्याच्या सुनावणीदरम्यान पैरवी अधिकारी यु.एल.धुमास्कर, पोलीस हवालदार शशिकांत कासार, महिला पोलीस हवालदार छाया कोपनर, पोहलीस हवालदार शशिकांत गोविलकर यांनी सहकार्य केले.

गुन्ह्याच्या शाबितीनंतर अतिरिक्त सत्र न्यायाधिश टी. एम. जहागिरदार यांनी सर्व ९ आरोपींना भा.दं.वि.कलम ३०२ सह १४९ प्रमाणे जन्मठेपेची शिक्षा आणि प्रत्येकी ५० हजार रूपये दंड ठोठावला तर दंड न भरल्यास १ वर्ष सक्तमजूरी आहे. भा.दं.वि.कलम ३४१ सह १४९ प्रमाणे १ महिना साधी कैद, भा.दं.वि. कलम १४३ सह १४९ प्रमाणे ६ महिने सक्तमजुरीची शिक्षा, भा.दं.वि. कलम १४७ सह १४९ प्रमाणे २ वर्ष सक्तमजूरी आणि भा.दं.वि.कलम १४८ सह १४९ प्रमाणे ३ वर्षे सक्तमजूरी तसेच भा.दं.वि. कलम१२०–ब अन्वये २ वर्षे सक्तमजुरी सर्व ९ आरोपींना सुनावली.

## संक्षिप्त...

### नवीन पनवेल येथे विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

१८ पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता पिल्लाई कॉलेज ऑफ इंजनिअरिंग नवीन पनवेल येथे विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी रायगड यांचे आदेशाने व उपजल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांचे उपस्थितीत १८८ पनवेल विधानसभा मदारसंघातील पिल्लाई कॉलेज ऑफ इंजनिअरिंग, नवीन पनवेल येथे १८ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नमुना नं. ६ चे – १६८ अर्ज व नमुना नं. ८ स्थलांतर / दुरुस्ती करिताचे – १४ अर्ज भरून घेण्यात आले. तसेच मतदार यादीत ऑनलाइन पद्धतीने नाव कसे नोंदवता येईल याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

### कर्जतमधील प्रहार कडमी येथे पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्हा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र गरुडझेप मार्फत कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे व कर्जत तहसिलदार डॉ. शीतलकुमार रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आज दि.३० नोव्हेंबर २०२२ रोजी प्रहार कडमी कर्जत येथे पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये कर्जत तालुक्यातील ८० प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. यावेळी परिविक्षाधीन नायब तहसिलदार अमरसिंह जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतिश शिंदे, मंडळ अधिकारी श्री.राठोड, तलाठी दत्ता ठोकळ तसेच प्रहार कडमीचे प्रतिनिधी श्री.रुपेश यांनी प्रशिक्षणार्थींना पोलीस भरतीच्या अनुषंगाने परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरणे, पुस्तकांची उपलब्धता, पोलीस भरती परीक्षेचा अभ्यासक्रम व शारिरीक क्षमता चाचणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# नवीन पनवेल परिसरात साथीच्या आजारांना आमंत्रण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एकीकडे पनवेल महानगरपालिका स्वच्छता सर्वेक्षणात सर्वोत्तम स्थान मिळविण्यासाठी पालिका प्रशासन विविध नाविन्यपूर्ण संकल्पना राबविते तर दुसरीकडे नविन पनवेल शहरात अस्वच्छताचे साम्राज्य दिसत आहे . पालिकेच्या 'स्वच्छ भारत'सर्वेक्षण २.० मोहिमेच्या जनजागृतीसाठी ब्रॅन्ड अ‍ॅम्बेसडरपदी प्रसिध्द क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर आणि मराठी इंडियन आयडॉल स्पर्धेचा विजेता सागर म्हात्रे यांची निवड केली. तसेच शहर स्वच्छ रहावे यासाठी सर्वसामान्य कर भरणाऱ्या नागरिकांना महापालिकेकडून नियमावली सांगितली जात आहे .त्याप्रमाणे पालिकेकडून अनेक कार्यक्रम राबविले जा–तात. यामध्ये स्वच्छतेची सवय व्हावी, घन कचरा व्यवस्थापन चांगल्या पध्दतीने व्हावे, शौचालयांची स्वच्छता अशा अनेक कार्यक्रमांच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी केंद्र शासनाच्यावतीने 'स्वच्छ भारत' हे अभियान राबविले जात असताना नविन पनवेल शहरातील वाढते बेकायदेशीर चिकन, मटण , मासे विक्रेते यांच्यावर महापालिकेचे कसलेही नियंत्रण नाही. यामुळे आदई सर्कल परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य दिसत आहे. बेकायदेशीर फेरीवाल्यांकडून नविन पनवेल बसस्थानक परिसरात रस्त्यावर कचरा टाकला जा–तो. तसेच रेल्वेस्थानक समोरील मार्गावर बेकायदेशीर रोजबाजारातील खाऊगल्लूया राजरोसपणे गटारीत घाण टाकत असल्यामुळे डांसाची पैदासमध्ये वाढ होऊन या परिसरात साथीच्या आजारांना आमंत्रण मिळते. याकडे महापालिकेचे अधिकारी अर्थपूर्ण दुर्लक्ष करताना दिसतात. सर्वसामान्य नागरिकांना कागदी व देखाव्या असलेले स्वच्छता बाबतचे कार्यक्रम राबवून खोट्या जाहिरातबाजी करुन नागरिकांच्या कर भरलेल्या पैशाची महापालिकेकडून उधळपट्टी केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

# ए.आर.अंतुले स्मृतीदिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा येथील कोकण उन्नती मित्र मंडळाच्या वसंतराव नाईक कला,वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले विज्ञान महाविद्यालय येथे बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त रक्तदान शिबाराचे आयोजन करण्यात आले आहे. स्वर्गीय बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांचा स्मृतिदिन कार्यक्रम शुक्रवार दि.०२ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ठीक ०९.३०वाजता कोकण उन्नती मित्र मंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि रायगड जिल्हा काँग्रेस पक्षाचे माजी अध्यक्ष आर सी घरत यांच्या उपस्थितीत महाविद्यालयात होणार आहे.१९९० पासून महाविद्यालयातून बी.ए,बी.कॉम. झालेल्या आणि विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी तसेच २०१८–१९ पासून बी.एससी,एम.कॉम. झालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी आणि बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांच्यावर प्रेम करणारे आणि म्हसळा तालुक्यातील सर्व नागरिकांनी दानात दान रक्तदान करणे हे जास्त महत्त्वाचे आहे. त्याकरिता आपण रक्तदान करण्यासाठी आवर्जून उपस्थित रहावे.असे आवाहन महाविद्यालय विकास समितीचे विश्वस्त सचिव प्रतिनिधी श्री.फजल हळदे,सदस्य महादेव पाटील,सदस्या श्रीम. निलम वेटकोळी,प्र.प्राचार्य प्रा.दिगंबर टेकळे, मा. प्र. प्राचार्य प्रा.एम.एस.जाधव, तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.

# श्रीवर्धन तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी झाली, तरी फायदा राष्ट्रवादी काँग्रेसलाच

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

२०१९ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जनतेने शिवसेना–भाजप युतीला स्पष्ट कौल दिला होता. परंतु मुख्यमंत्रीपद कोणाला या वादावरून महाविकास आघाडी स्थापन झाली व महाराष्ट्रा मध्ये शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले.किंबहुना त्यांना मुख्यमंत्री करण्यासाठीच महाविकास आघाडी स्थापना झाली. राज्यातील बहुतांश महानगरपालिका, नगरपालिका, तसेच ग्रामपंचायती यांचा कार्यकाळ संपलेला असून सर्व ठिकाणी प्रशासक नेमलेले आहेत. आता कोविडचा प्रादुर्भाव संपल्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका घेतल्या जात आहेत. ग्रामपंचायती नंतर महानगरपालिका व नगरपालिका, जिल्हापरिषद, पंचायत समिती यांच्या निवडणुका होणार आहेत.

या सर्व निवडणुकांमध्ये महाविकास आघाडी तर्फे जागा लढवण्याचे नक्की झाल्याचे बोलले जात आहे. जरी महाविकास आघाडी झाली तरी त्याचा स्पष्ट फायदा राष्ट्रवादी काँग्रेसलाच श्रीवर्धन तालुक्यात झालेला पाहायला मिळेल. श्रीवर्धन शहरामध्ये नगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बाळासाहेबांची शिवसेना व भारतीय जनता पार्टी यांची युती पक्की झाली आहे. अनेक शिवसैनिक बाळासाहेबांच्या शिवसेनेत आल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षामध्ये असलेले शिवसैनिक महाविकास आघाडी मध्ये फारश्या जागा निवडून आणतील असे चित्र दिसत नाही. १९९५ साला अगोदर श्रीवर्धन काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर ए. आर. अंतुले व त्यानंतर श्रीवर्धन चे आमदार असलेले व महाराष्ट्राच्या तत्कालीन सरकारमध्ये राज्यमंत्री असलेले रवींद्र राऊत यांचा श्रीवर्धन मतदार संघात प्रचंड दबदबा होता. परंतु १९९५ साली झालेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेनेचे श्याम सावंत यांनी काँग्रेस उमेदवाराचा पराभव करून श्रीवर्धन मतदारसंघात विजय संपादन केला होता. त्यानंतर सलग तीन वेळा श्याम सावंत हे शिवसेनेकडून विजयी झाले होते. त्यानंतर नारायण राणे यांनी शिवसेनेत बंड केल्यानंतर श्याम सावंत यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला व श्रीवर्धन मतदारसंघातील आमदारकीचा राजीनामा देऊन ते पोट निवडणुकीला सामोरे गेले.

या पोटनिवडणुकीमध्ये त्यांचा सपशेल पराभव झाला. शिवसेनेचे तुकाराम सुर्वे श्रीवर्धन मतदारसंघातून विजयी झाले होते. परंतु २००९ साली सुनील तटकरे यांचा रोहा–माणगाव मतदार संघ पुनर्रचनेत गायब झाल्यानंतर, सुनील तटकरे यांनी श्रीवर्धन मतदारसंघातून निवडणूक लढवून विजय संपादन केला होता. त्यानंतर त्यांचे पुतणे अवधूत तटकरे श्रीवर्धन चे आमदार झाले होते. तर आता त्यांच्या कन्या अदिती तटकरे या श्रीवर्धनच्या आमदार आहेत. श्रीवर्धन तालुक्यात भारतीय जनता पार्टीचे फारसे वर्चस्व नसल्यामुळे, बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाबरोबर युती केल्यामुळे काही जागा या युतीला नक्की मिळू शकतात. परंतु शिवसेनेमध्ये पडलेल्या उभ्या फुटी मुळे त्याचा संपूर्णपणे फायदा राष्ट्रवादी काँग्रेसलाच होईल. असे भाकीत अनेक राजकीय जाणकारांमधून वर्तविले जात आहे. कारण श्रीवर्धन मतदारसंघातून पहिल्यांदाच महिला उमेदवार उभी राहिल्याने अदिती तटकरे यांनी तब्बल ४० हजार मतांनी विजय संपादन केला होता. आज पर्यंतच्या इतिहासामध्ये श्रीवर्धन मतदारसंघात विजयी उमेदवार सात ते आठ हजार इतक्या मताधिक्क्यानेच विजयी होत होता. तरी आत्ता होऊ घातलेल्या श्रीवर्धन तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचाच वरचष्मा असेल, असे बोलले जात आहे. तर आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये देखील महाविकास आघाडी झाली तरी राष्ट्रवादी काँग्रेसलाच जास्त जागा मिळतील असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमधून व्यक्त केला जात आहे.

# पनवेल-उरण महाविकास आघाडीने मानले मतदारांचे आभार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल को–ऑप अर्बन बँक निवडणुकीत महाविकास आघाडी पुरस्कृत सहकार पॅनेलचे सर्व उमेदवार विजयी झाल्याबद्दल महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील व सचिव सुदाम पाटील यांनी मतदारांचे मनपूर्वक आभार मानले आहेत. यासंदर्भात त्यांनी आभारपत्रक काढून सर्व उमेदवारांना विजयी केल्याबद्दल तमाम मतदारांचे, व्यापारी तसेच या निवडणुकीच्या प्रचारामध्ये सहभाग घेतलेल्या सर्वपक्षीय नेते पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले आहेत.

सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

## (वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | करारनामा/वाटपपत्र करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता.पनवेल, जि.रायगड** | | | | | | | | |
| १ | वहाळ १०४५ | १९५ | २१९/१<br>२१९/९ | ०-०८-१<br>०-०२-० | एकूण मंजूर १०० चौ.मी. प्रस्तावित | मौजे उलवे येथे भूखंड क्र. २६, सेक्टर-२३, क्षेत्र १०० चौ.मी. | **कै. गोमीबाई गोमा ठाकूर ऊर्फ गोमी गोमा तांडेल (मयत) यांचे वारस**<br>श्री. बाळाराम गोमा तांडेल | निरंक |
| | | | एकूण | ०-१०-१ | | | | |
| २ | तळोजा १०७३ | तळोजे पाचनंद १२९/२८ | ३०३/५क<br>३०३/५ब | ०-११-२<br>०-०६-१ | १५० चौ.मी. | भुखंड क्र. १५५, सेक्टर-२, क्षेत्र १४९.६९ चौ.मी | **१) कै. दत्तू गोमा तांबडे (मयत) यांचे वारस**<br>१.१) श्री. बुधाजी दत्तु तांबडे<br>१.२) श्री. गुरुनाथ दत्तु तांबडे<br>१.३) श्री. मोरेश्वर दत्तु तांबडे<br>१.४) श्री. सुरेश दत्तु तांबडे<br>१.५) श्री. प्रकाश दत्तु तांबडे<br>१.६) श्री. अंकुश दत्तु तांबडे<br>१.७) श्री. लहु दत्तु तांबडे<br>**२) श्री. दशरथ गोमा तांबडे**<br>**३) कै. जनाबाई बाकु उर्फ बाब्या म्हात्रे (मयत) व श्रीमती. सुमन अन्ना म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>३.१) श्री. राम बाल्या उर्फ बाब्या म्हात्रे<br>३.२) श्रीमती कल्पना रामदास भगत<br>३.३) श्रीमती निर्मला यशवंत भोईर<br>३.४) श्रीमती शशी बाळाराम म्हात्रे<br>**४) श्रीमती बारकुबाई श्रावण जितेकर** | निरंक |
| ३ | गव्हाण ४२ | २९९/३३० | २८/१ व इतर | ०-९९-७ | एकूण मंजूर ९०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित | मौजे उलवे येथे भूखंड क्र. ३६५, सेक्टर-१९, क्षेत्र ३०० चौ.मी. | **दामोदर धर्मा कोळी (मयत) यांचे वारस**<br>श्रीमती नर्मदाबाई बंधु कोळी<br>श्रीमती गंगाबाई पद्माकर कोळी | स्पे.मु.क्र. १९८/२००६<br>स्पे.मु.क्र. २०६/२००६<br>रे.मू.क्र. २५४/२००७<br>स्पे.मु.क्र. ८५/२०१० |
| | | | एकूण | ०-९९-७ | | | | |
| **नोड – द्रोणागिरी** | | | | | | | | |
| ४ | २४५+ २८० | वाल्टीखार ७३/८६ | २०/६ | ०-०९-० | ४० चौ.मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. १३०, सेक्टर-५२, क्षेत्र ४० चौ.मी. | **मुळ भूधारक श्री. कृष्णा सुदाम ठाकुर व इतर ५ अल्पभूधारकांपैकी**<br>**१. श्रीमती रमाबाई आंबो पाटील** | निरंक |
| **ता. उरण, जि. रायगड** | | | | | | | | |
| ५ | पागोटे/ ९२६ | ७३ | १/९<br>२/५ | ०-८-८<br>०-२९-० | ३५० चौ.मी. | द्रोणागिरी येथील सेक्टर क्र. ४१, भूखंड क्र. ५५, क्षेत्र ३५० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे. | भूधारक **अशोक हिरु पाटील (फरार/गहाळ) व काशिबाई हिरु पाटील (मयत)** यांचे वारस<br>**१) कृष्णा अर्जुन पाटील (मयत)** यांचे वारस<br>१) दत्तात्रेय कृष्णा पाटील,<br>२) परशुराम अर्जुन पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, सबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे तसेच भूधारंकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात, अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र/करारनामा करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

सिडको/जनसंपर्क/३४६/२०२२–२३